# मीना खोंड

# अलेक्सा



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे




लेखिका : मीना खोंड

# अलेक्सा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अलेक्सा


लेखिका मीना खोंड

हैद्राबाद

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप 9703942425

ई मेल -- meenakhond@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ मे २०२०



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.




*  अर्पण पत्रिका

माझ्या लाडक्या बालमित्रांनो

माझ्या प्रिय बालवाचकांनो

" अलेक्सा "

ई बुक

तुम्हाला  स्नेह भेट.

मीना खोंड

बालकथा

* कथांकन

१ अलेक्सा. (किशोर मासिक दिवाळी अंक 2019)

२ शाब्बास (किशोर मासिक)

३ माणसातील माणुसकी

४ चिऊ ताई ( दिव्य मराठी)

५ चला बागेत जाऊ

६ खरी पूजा ( मुलांचे मासिक)

७ राखी

८ सोलर मून

९ इंस्टंट फुड

१० सहल





मित्रांनो तुमच्यासाठी छान छान गोष्टी आणल्यात.

हातात पुस्तक घेऊन  वाचायच नाही.आता सगळं ऑनलाईन आहे .हातात तुमच्या फोन असतो,टॅब असते, आयपॅड असतं...त्यात ई -बुक "अलेक्सा "  तुमच्याकरिता वाचायला आहे .

मुलांनो आज देशाला संशोधकाची आवश्यकता आहे. खेळाडू, फिल्मस्टार, राज्यकर्ते, लोकनेते, सामाजिक कार्यकर्ते, पोलिस कमिश्नर हे सगळे महान हस्ती आपण बघतो. पण तुम्ही कधी संशोधक ,वैज्ञानिक बघितलेत? किती संशोधकांची नांव आपल्याला माहिती आहेत?

आज देशाला संशोधकांची आवश्यकता आहे.

आता मुला -मुलींनी तुम्ही संशोधक व्हायाला हवं. याच एका उद्देशाने ,कळकळीने मी तुमच्याकरीता वैज्ञानिक गोष्टी घेऊन आलेय.

अलेक्सा, इंस्टंट फूड आणि सोलर मून या चित्तवेधक वैज्ञानिक कथा आहेत.सोलर एनर्जी म्हणजे सूर्य उर्जा याचा आपल्या उपयोग कसा करता येईल  हे सोलरमून मध्ये आहे.

"अलेक्सा " पुस्तकात मनोरंजक कथा आहेत, अलेक्सा,सोलर मून ,इंस्टंट फुड वैज्ञानिक कथा रोचक आहेत.मस्त आहेत, वाचा.

"शाब्बास " ही कथा स्वच्छता पाळायला मजेशिर रितीने सांगते. पर्यावरण-परिसर स्वच्छ ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

"माणसातील माणुसकी ".... पैसा कुठे आवश्यक आहे याचा विचार करायला हवा हे सांगते.एखादा भुकेला माणुसकी जागवून जातो.

चिमणीला आपण" चिऊताई " म्हणतो.आपण प्राण्यांशी ,पक्ष्यांशी नातं जोडलय.पण आताशा ही आनंद देणारी चिऊताई दिसतच नाही." चिऊताई "कथा वाचा.बघा कुठे गेली चिऊताई! "चला बागेत जाऊ" ही कथा तर एकही जोडाक्षर नसलेली आणि छान छान कविता असलेली कथा आहे.

"खरी पूजा " पर्यावरणावर आहे.कृत्रिम रंग ,प्लास्टर ऑफ पॅरिसमुळे पाणी दुषित होत .जलचर प्राण्यांच्या दृष्टीन आपल्याला पाणी , स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे.

वृक्ष लावा हा मानव जीवनाचा मंत्र आहे.

"राखी" या कथेत नीतीमूल्ये आहेत. मुलं कुठेही असू देत सण,संकृती प्रिय असतात. सणांमधून संस्कार शिकतात.

"सहल" ही मनाला स्पर्शून जाणारी ,सामाजिक भान असलेली,नात्यांची महती सांगणारी कथा आहे.

अलेक्सा ई बुक मध्ये तुम्हाला आवडणाऱ्या, तुम्हाला काही सांगणाऱ्या प्रेरक मनोरंजक कथा आहेत.

मित्रांनो ,वाचनामुळे मुलांवर संस्कार होतात. या संस्कारातून मुलांच व्यक्तीमत्व घडतं. मुलांनी संपन्न व्यक्तिमत्व संपादून सुरेल सुंदर जीवन जगावं.एक चांगला नागरिक व्हावं माणुसकी असलेला माणूस व्हावं.

मुलांनो विविध कथांचा हा खजिना तुम्ही बघा ,उलगडा , वाचा. आणि मला फोन करा.

शुभेच्छा!

मीना खोंड



किरण केंद्रे , संपादक, किशोर, बालभारती, पुणे



` अलेक्सा` हा श्रीमती मीना खोंड यांचा  किशोर मुलांसाठीचा संग्रह प्रसिद्ध होत असल्याचा आनंद होत आहे. नव्या पिढीतील मुलांचे भावविश्व ही फार गमतीदार गोष्ट आहे. आजूबाजूचे व्यवहार आणि वास्तवाच्या पलीकडे जाऊन त्यांच्या मनाचा तळ गाठणे ही कठीण बाब आहे. लेखिकेने मात्र हे आव्हान लीलया पेलले आहे. मुलांना आनंद देतानाच त्यांच्या संवेदनशील मनावर उत्तम मूल्यांचे संस्कार व्हावेत ही त्यांची भूमिका आहे. चौकस प्रवृत्तीच्या मुलांना पडणारे विविध प्रश्न, मानवी नाती, निसर्गाशी असणारे साहचर्य सोबतच आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी त्यांची असलेली गट्टी असे विविध विषय त्यांनी आपल्या कथांमधून हाताळले आहेत. या कथांची भाषा किशोरवयीन मुलांना भावेल अशी साधी, सोपी आणि प्रवाही आहे. जन्माला येणारे प्रत्येक मूल हे सर्जनशीलतेचा वसा घेऊन जन्माला येते. तो वसा अधिक प्रवाही करण्याचे काम या कथा करतात. संस्कार, मनोरंजन आणि प्रबोधन हे या कथांचे सूत्र आहे. नवनवीन कल्पना, रंजक वर्णने आणि मुलांशी असलेली एकरूपता यामुळे हा कथासंग्रह वाचनीय झाला आहे. मुलांची संवेदनशीलता आणि त्यांचे भावविश्व जपणाऱ्या, ते अधिक समृद्ध करणाऱ्या कथा या संग्रहात आल्या आहेत. या कथा मुलांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहणार आहेत. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या कथासंग्रहाचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो. मीनाताईंना पुढील लेखनासाठी खूप साऱ्या शुभेच्छा !



# अलेक्सा



1... अलेक्सा

" अथर्व, अथर्व ऽअरे अथर्व"

काय ग आजी?

" अरे लक्ष कुठंय? केंव्हांची तुला बोलावतेय. तल्लीन होऊन सारखा फोन बघत असतो... सारं लक्ष त्या मोबाईलमधे असतं. "

"अग आजी, तू तल्लीन होऊन  तुझ्या विठुरायाकडे बघतेस न? कुणाशी बोलत नाही! "

"अरे कुठे तुझा मोबाईल अन् कुठे माझा विठुराया!! "

"अग असं कसं म्हणतेस? तूं बोलतेस नं विठूरायाशी? काय बोलतेस? "

"अरे तो माझा सखा आहे ईश्वर आहे. "

" मग फोनही माझा सखा आहे. "

"माझा देव जगन्नीयंता आहे. सर्व ज्ञान संपन्न आहे "

आजी इकडे ये... बैस इथे...

"आता आणखी काय? "

"आपण आता इथे बसलोय न? आता बघ बेडरुमचे लाईट लावलेत. "

"आणि हे काय! !! अरे आत्ता टीव्ही सुरु होता. आता ही भक्ती गीतं कुणी लावली? "

"अग ताईने माडीवरुन फोन मधून तुझ्यासाठी भक्ती गीतं लावलीत. "

"वाह! छान! बघ किती प्रेम करता माझ्यावर! किती काळजी घेता आजीची! अथर्व, संध्याकाळ झाली साडे पाच वाजलेत. अंधारलंय. लाईट लावते. "

"अग आजी फक्त चार मिनिट थांब. प्लिज"

"अरे हे काय! लाईट आपोआप लागलेत!
आश्चर्यच आहे!"

" पण चमत्कार नाही बरं! "

"अथर्व मी एक विचारतेय.... तुझ्या फोन मधे अधून मधून टिंग टिंग कसला आवाज येतो रे? "

"ये हे बघ... "

"अरे हे आपलं समोरच दार आहे. एक माणूस कुत्रा घेऊन चाललाय! सगळं इथे बसल्या बसल्या दिसतंय. "



" घरासमोरुन कुणी जात असेल तर आपल्याला फोनमधे दिसतं. कॅमेरा लावला आहे. सेक्युरीटी आहे. हे सगळं अपण कुठेही असलो तरी आपण आपलं पूर्ण घर फोनमधे बघू शकतो. आणि आजी रात्री अलार्म लावतो. "

"आता तुला एक मजा बघ दाखवतो... ही कार ओळखतेस? "

" हो ! तुझ्या आईची..... सुस्मिताची आहे "

" ती घरी यायला निघाली आहे आणि आपण तिची कार घरुन बघू शकतो. ती कुठे आहे, केंव्हा येईल आपल्याला सगळं समजतं. आपण ट्रॅक करतो. ती वीस मिनीटांनी घरी येईल बघ. "

" हो रे सारं विचित्र आश्चर्य आहे. "

"तुझा देव बोलतो कां ग आजी? "

"हो तर! "

" मग आता कोण बोलतो हे बघ! "

"अरे ही तर डबी आहे. "

" नाही स्मार्ट स्पिकर आहे. ही अलेक्सा आहे. ऐक.... अलेक्सा व्हाटस् द टाईम नाऊ? "

"इटस् फाईव्ह ट्वेंटी पी. एम. "

"अलेक्सा व्हाटस् द टेंपरेचर टुडे? "

"टुडेज् टेंम्परेचर इज फोर्टीन डिग्री सेंटीग्रेड. "

" अलेक्सा स्विच ऑन कांन्झरवेटरीज् लाईटस्, ॲन्ड गार्डन लाईटस्

"ओ के"

"अरे वा! खरंच लाईट लागलेत! हे सगळं कसं होत रे? मला तर समजण्याच्या पलिकडे आहे माझ्या आवाक्याबाहेरचं आहे. "

अग टाईमर, सेन्सर, अलार्म, हिटर लावणं -हिटर बंद करणं, लाईटस् लावणं -बंद करणं,टीव्ही, प्रिंट घेणं, टॅक्सी बुक करणं, टॅक्सी ट्रॅक करणं, ॲमॅझॉनवर किंवा ऑनलाईन सामान ऑर्डर करणं अभ्यास, परीक्षा, पेपर, सूचना, हवामान, आमंत्रण सगळं फोनवर होतं.

हा बघ फोटो.... मला स्कालरशिप मिळाली.

आणि हा फोटो बघ. आम्ही गाण्याचा कार्यक्रम वृद्धांच्या मनोरंजनाकरीता कार्यक्रम केला होता. म्हाताऱ्या आजी आजोबांना वृद्धाश्रमात बघून कसंतरी वाटतं!

"अग आजी, तुझा विठुराया माझ्या फोनमधे आहे. थांब हं.... हा बघ. "

"वाह! .. किती सुंदर रुप.. बघतं रहावं माझ्या विठुरायाकडे! "



" तुझे स्तोत्र, पोथी, गीता, ज्ञानेश्वरी, उपासना, पूजा कशी करावी? सगळं या फोन मधे आहे. अग लोकमान्य टिळकांवर निबंध लिहायचा होता. मला गुगलवर सगळी माहिती मिळाली. मला प्रथम पारितोषिक मिळाले. अग आजी  पेपर, अभ्यासही फोनवर करतात. बघ बरं फोन किती कामाचा आहे. म्हणून फोन मी बघतो ग. "

"अरे पण माणसांशी केंव्हा बोलायचं? "

"एक मिनिट हं आजी.... बघ कोण आहे? "

"अरे ही अनु! तुझी अनुआत्या... "

अथर्वने व्हिडिओ कॉल लावला.

“अनुआत्याशी बोल आजी "

"हं बोल आई”

“कशी आहेस अनु? "

"मी मस्त! तूं कशी आहे आई? "

"अग काय सांगू.. नातवासोबत मजेत आहे. आणि सोनु कुठेय ग? "

"सोनु ऽही बघ आजी... "

"अग बाई गोडुली कशी  दुडुदुडु धावते.. "

"बघ आजी बोललीस नं आत्याशी... "

"हो रे राजा! कित्ती दिवसांनी अनुला, सोनूला बघितल रे! खूप दिवसांनी अशी भेटले.. खूप दिवसांनी बोलले. खूप दिवसांनी बघितले. "

"अरे हे काय करतोस? "

"अग तुझे डोळे भरुन आलेत न... पुसतो ग! बरं आजी आईस्क्रीम खायचंय? "

" आत्ता? आता कुठे बाहेर जायचं? "

"अग दहा मिनिटात आईस्क्रीम घरी येतंय. मी फोनवरुन ऑर्डर करतो.

"पैसे घरी देशील कां? "

"नाही ग ते आपोआप कट होतात "

"अग आजी हे सारं विज्ञान आहे, तंत्रज्ञान आहे. विज्ञानाची देणं आहे. आपण व्यवस्थित वापर करायचा. आज तुला फोन किती उपयोगाचा आहे हे फक्त दाखवले.

"पण मग अभ्यास, खेळणं वगैरे केंव्हा करतो?

"अग आजी खेळणं, व्यायाम, अभ्यास, होमवर्क सगळं करतो. अग मी फुटबॉल खेळतो, स्विमिंग क्लासला जातो, गणिताच्या ट्युशनला जातो, जर्मन भाषा शिकतो, गिटार वाजवतो. "

"बापरे!! एवढं सगळं करतो? कित्ती हुषार आहे माझा राजा! "

" तुला हे सगळं छान कसं समजतं? "

"टाईम टेबल करतो. आणि त्याप्रमाणे वागतो. मी फेसबुक व्हाटस् ॲप बघत नाही. मी फोन बघत नाही डोळ्यांची काळजी घेतो. आई बाबा ताई आमचा ग्रुप आहे त्यावर रोज एक सुविचार आई बाबा टाकतात. "

"आजी तूं देवाविषयी सांग न"

" अरे देणारा तो देव असं समजतो. आपण कृतज्ञतेला महत्व देतो. म्हणून सूर्याला, नदीला, वृक्षांना, गाईला, दिव्याला देव मानतो आपण आदर्श पुरुषांना देव मानतो. म्हणून राम, कृष्ण, बुद्ध यांना देव मानतो. अथर्व तुझा देवावर विश्वास आहे? "

"हो आजी. सकाळी उठून कराग्रे वसते लक्ष्मी हा श्लोक म्हणतो. संध्याकाळी शुभंकरोती म्हणतो. राम रक्षा म्हणतो. बाबा म्हणतात सेवा म्हणजे पूजा! सेवेत देव असतो!



गरजूंना मदत करणे ही खरी पूजा आहे. गरीबांना, अनाथांना, मदत करण्याच माझं आणि बाबांच प्रोजेक्ट आहे! अग मागच्या वर्षी मी एका अंध मुलाचा राईटर झालो होतो. परीक्षेत त्याचा पेपरर लिहून दिला. आई म्हणते Work is worshipआपलं काम हीच खरी पूजा आहे. "

" आणि तुझी आजी काय म्हणते? "

" तूंच सांग काय म्हणतेस? "

"विज्ञान आणि  संस्कार, नाते आणि समाजभान या साऱ्याची समज तुला आहे. बस एवढंच हवयं! खूप मोठा माणूस हो राजा.

माझ्या अथर्व बाळा! तूं माणुसकी असणारा माणूस हो! माझ्या राजा, खूप मोठा माणूस हो! माझा आशिर्वाद आहे तुला! "

"आजी तुझे पाय कुठेय? तुझ्या पाया पडतो. "

"शुभं भवतु "

( किशोर दिवाळी अंक)

2

## * शाब्बास *

"अरे अजू, काय झाल रे? असा गुपचुप गुपचूप हिरमसून बसलास! खरं सांग मला. " ताई कळकळीने विचारत होती.

"ताई, अग एक माणूस... "

"अरे काय झालं सांग ना राजा. "

"अग एक माणूस रस्त्यावर केळीच्या सालीवरुन घसरुन  पडला! खूप वाईट वाटलं ग." अजूच्या डोळ्यात पाणी होतं.

" त्याला खूप लागल कां? " ताईने काळजीच्या सूरात विचारले.

"तिथल्या काही लोकांनी त्याला दवाखान्यात नेलं! "

"म्हणजे आता काळजीच कारण नाही. पण तूं कां रडतोस? तुला कां  इतकं वाईट वाटलं? "

"ताई मला माफ कर! ते केळीचं साल मीच रस्त्यावर फेकलं होतं. ताई ऽ ऽ! "



"अजू रडू नको. पण या अनुभवावरुन धडा शिकलास नं? अरे कचरा असा रस्त्यावर फेकू नये, रस्ता अस्वच्छ करु नये. बघितलंस अस्वच्छतेमुळे अपघात झाला. अस्वच्छतेमुळे रोगराई पसरते" ताई  अजूला जवळ घेऊन समजावत होती.

"हो ताई.... पुन्हा रस्त्यावर काहीच फेकणार नाही. थुंकणार नाही. "

"ताई, तिकडे बघ संजू आणि मोनू आलेत. "

"काय झालय संजू? डोळे लाल झालेत, शिंकतो आहेस."

" लोकांनी रस्त्यावरच कचरा जाळला. धूरच  धूर झालाय. धूर, वास, काजळी वातावरणात पसरली. त्याचा त्रास होतोय ग ताई. प्रदुषण किती झालयं बघितलय  नं!"

"अग हो ग ताई! कचरा जमा करतात लोकं! किती डांस, माशा  होतात. "

" हो मी तेच सांगतेय. कचरा कुठेही टाकला की  घाण होते, डांस होतात, रोगराई पसरते!

"अग ताई  आत्ता मी येतांना बघितलं "... सांगताना मोनू हसला.

"अरे सांग न. कां हसतोस मोनू.. " संजू उत्सुकतेने विचारत होता.

" अरे आता तिथे बगिच्याजवळ एक माणूस उघड्यावर सूऽसू करीत होता. "

" शीऽ ऽ! "  राजू ओरडला

"अरे  ऐक नं मजा....

तिथून आमदार चालले होते त्यांनी गाडी थांबवली. त्यांच्या ड्रायव्हरने त्याला ओढत आणलं. आमदार साहेब त्याला असे रागवले. बापरे!! खूप लोकं जमले होते! आमदार साहेबांनी त्याला आणि तिथे जमलेल्या लोकांना ' रस्त्यावर मूत्र विसर्जन करणार नाही ' अशी शपथ घ्यायला लावली. सगळ्यांनी  शपथ घेतली.

"आता तुम्ही सगळ्यांनी शपथ घ्या.... ' रस्ता घाण करणार नाही. रस्त्यावर शी, सू करणार नाही. कुठेही थुंकणार नाही. रस्त्यावर कचरा टाकणार नाही. आपला परिसर, आपलं गाव, आपला देश स्वच्छ ठेवू. '... मनापासून शपथ पाळायची.

ताई आम्ही ही शपथ शंभर टक्के पाळू.

शाब्बास!



## * माणसातील माणुसकी *

राजूचा अभ्यास तसा झाला होता. पण परीक्षा म्हटलं की मनावर थोडा ताण असतो. टेन्शन असत. आता एकच दिवस उरला होता.... परवा पासून परीक्षा सुरु!!

चला देवळात जाऊन येऊ तेवढीच मनाला प्रसन्नता जाणवेल असा विचार करुन राजू आईला म्हणाला

" आई मी देवळात जाऊन येतो. "

"जाऊन ये. पाय आणि मन दोन्ही मोकळं होईल. अरे परीक्षेचं टेन्शन घेऊ नको. "

"अग तेच! पास होण्याची जबाबदारी आणि सगळं टेन्शन देवाला देऊन येतो. त्याला सांगतो 90%च्या वर गुण हवेत!

" काही तरीच तुझं! अरे तुझा अभ्यास झाला आहे, मग टेन्शन कसलं? बरं हे अकरा रुपये  घे. देवळात दानपेटीत आठवणीने पैसे टाक. "

" हो आई. टाकतो. " आईने दिलेले अकरा रुपये खिशात ठेवून राजू देवळात जायला निघाला.

रस्त्यात  खूप थकलेला म्हातारा बसला होता.

तो राजूला म्हणाला " खूप भूक लागलीय पोरा.... दोन दिवसापासून उपाशी आहे. काही खायला दे रे! "

खरंच खूप थकलेला होता. त्याला बोलण्याचंही त्राण नव्हत. किती केविलवाणे खायला मागत होता.  राजूने आईने दिलेल्या अकरा रुपयातून करी पॉईंट मधून दहा रुपयाची पुरी भाजी घेतली आणि त्या म्हाताऱ्याला दिली.

म्हाताऱ्याने अक्षरशः आधाशासारखी गपागप खाल्ली. असं वाटलं हा किती दिवसाचा भुकेला आहे. अर्धी प्लेट संपल्यावर म्हातारा म्हणाला.... " पोरा आत्मा तृप्त झाला. तू पहिल्या नंबरानं पास होशिल. सुखी रहा पोरा. दोन्ही हाताने दुरुनच त्याने आशिर्वाद दिला."

" याला कसं कळलं माझ्या मनातलं? मी न मागताच याने आशिर्वाद दिला. " राजू हसला.

तो देवळात गेला. बाप्पाचे दर्शन घेतले. अकरा रुपयापैकी वाचलेला एक रुपया देवळातील दान पेटीत टाकला. देवाला मनोभावे नमस्कार करुन घरी आला.

आई म्हणली " शांत शांत दिसतो. देव बोलला वाटतं! काय म्हणाला देव? "

" आई, प्रथम तुझी माफी मागतो. "

" काय झालं? कसली माफी? कशाकरीता? " आईला काही समजेना.

" तूं रागवणार नाही? "

" अरे नाही! काय झालं सांग? "

राजूने सगळी हकीगत आईला इत्थंभूत सांगितली. " एक म्हातारबुवा भुकेने कासाविस झाले होते. बोलायचेही त्राण नव्हते. चेहरा करूण दिसत होता. मला दया आली. तूं देवासाठी दिलेल्या अकरा रुपयातून दहा रुपयाची पुरी भाजी घेऊन त्यांना खायला दिली. त्यांच्या चेहऱ्यावर केवढा आनंद पसरला होता. "



" चांगल केलं. एक नेक काम केलं! शाब्बास राजा!  "

"आई तुझा फक्त एकच रुपया देवळात टाकला. "

"अरे हे दहा रुपये देवाला पावले. तुझ्यामधली माणुसकी बघून माझं मन भरुन आलं! तूं माणुसकीला जागला. मला हेच हवंय. देव  माणसात असतो हे तूं जाणले. तूं माणुसकी असलेला माणूस म्हणून खूप मोठा हो, यशस्वी हो  हाच माझा आशिर्वाद आहे!

आईने राजूला जवळ घेऊन अवघ्राण करुन आशिर्वादाचे दोन्ही हात राजूच्या डोक्यावर ठेवले.

४

## चिऊ ताई ये

आकाश ढगाळ झाले होते. काळ्या मेघांनी आभाळ भरगच्च भरुन आल्यामुळे अंधारुन आलं होत. पाऊस सुरु झाला होता. आपल्या घरी जावं. पण आपलं शेणाचं घर तर पावसात वाहून गेलं असेल! कुठे जावं? कुणाच्या अंगणात जरी गेलं तरी ' हट् हट्.. कावळ्या हट् ' करुन हाकलून देतात! कुठे जावं? कुठे आडोसा शोधावा? या पावसात कुठे आश्रय शोधावा? कुणाकडे जावं?

तेवढ्यात आठवण आली आपल्या चिऊताईची ... चिमणीची!

तिचं घर आपलं हक्काच घर होतं!! आपल्या चिऊ ताईच घर! भरभक्कम घर! अशा पावसात तिच्या घरी जावं.

' चिऊ ताई चिऊ ताई दार उघड 'म्हटलं की म्हणायची थांब माझ्या बाळाला न्हाऊ घालते. पुन्हा हाक दिली की म्हणायची थांब माझ्या बाळाला कपडे घालते. पुन्हा दारावर टकटक केली की म्हणायची 'थांब माझ्या बाळाला पावडर लावते, माझ्या बाळाला तीट लावते. माझ्या बाळाला खाऊ घालते, माझ्या बाळाला झोपवते, माझ्या बाळाला अंगाई म्हणते. '

ती कशी तिच्या बाळात गुंतून गेलेली असायची.

ती त्या बाळाची फक्त आई होती. किती प्रेमाने बाळाचं करत होती. बाळापुढे तिला काही सुचत नव्हतं! अगत्य आणि अतिथ्यापुढे मातृप्रेम महान होत! तिच्या वात्सल्याच्या कौतुकात प्रतिक्षेचा आनंद होता. तिच्या मातृरुपाचा आनंद आणि अभिमान वाटायचा.



आपल्या चोचीतला दाणा पिलाच्या चोचीत भरवायची तेंव्हा ते लडिवाळ मातृरुप बघत रहावस वाटायचा. तिचं बोलणं ऐकत रहावसं वाटायचं!

पण आता कुठे ती चिऊताई? आता कुठे तिचं घरटं? ती दूर दूर निघून गेली. खेड्यात दाणे टिपत असतांना कधी तरी दिसली होती. तिचं दर्शनही आता दुर्लभ झालय?

चिऊताई साऱ्यांची लाडकी! चिऊताईला दाणे द्यायचे. तिचे गाणे म्हणायचे. लहान मुलं लाडक्या चिऊ ताईला बघून कित्ती हसायची. तिला ये ये अशी चिमुकली बोट हलवून बोलावायची. तिच्याशी माणसाने ताईचे नातं जोडलं. ती लोकांच्या घरातही घरटं बांधायची. आता सगळे विचारतात चिऊ ताई गेली कुठे? लहान मुलांना चिऊताई दाखवायची कुठे?

चिऊ ताई ये
दाणा खा
पाणी पी
उडून जा.

असं म्हणायचे.
म्हणून उडून गेली कां?

पण चिऊ ताई मला तुझं घर हवयं. तुझं ते मायेच बोलणं, ते मातेचे बोल, ऐकायचे आहेत. फार आवडायचे ते लडिवाळ मायेचे बोल! तुझ्या घरासमोर उभं राहयचं आहे. तुझ्या घरात यायचं आहे! ....

पण तूं हल्ली दिसतच नाही!
सगळे विचारतात चिऊ ताई दिसली कां?

तुम्ही चिऊ ताईला बघितलं कां?
चिऊ ताई  तूं  कुठे गेली?
चिऊ ताई ये, चिऊ ताई ये!

चिऊ ताई कुठे गेलीस तू?
भुरर्कन उडून कुठे गेलीस तू?
कुठल्या गावात कुठल्या घरात तुझं घर
सांग चिऊ ताई कुठे आहेस तूं?



## * चला, बागेत जाऊ! *

—*—*—*—*—*—*—

" चल उदय, आपण बागेत जाऊ. "

" चल अभय. मी तयार आहे. निघू या. "

" वा! किती छान  बाग आहे! हिरवी हिरवी झाडं, थंडगार वारा, रंगीत रंगीत फुलं, मंद मंद सुगंध... कसं ताजतवानं वाटतं. "  उदयला बगिचा खूप आवडला. खूप आनंद झाला.

" अभय , आपण धावू , खेळू, पळू, मजा करु! चल.... एक, दोन, तीन.... रेडी ऽ". उदयने टाळी वाजवली.

" घसरगुंडीवरुन घसरु. गोल गोल फिरु, " दोघंही गाऊ लागले. नाचू लागले.

'उदय.... तूं  थकला कां रे? ' अभय ने आपुलकीने विचारले.

" नाही रे  अभय!   बागेत  किती छान वाटलं.  ताजं ताजं वाटतं! " उदय खूप खूष होता.

" उदय बघ. फुलाफुलावरील फुलपाखरं, डुगुडूगु चालणारे बदक, आकाशात उडणारे पक्षी, चिवचिव चिमणी, हिरवा हिरवा पोपट.... किती छान आहे! " अभय एक एक दाखवत होता!

तर उदय बडबडत होता....

" झुळझुळ वारा गाणारा,
पक्षी बघा ऊडणारा...
रंगी बेरंगी फुलेच फुले,

खेळू बागडू सानुली मुले.... "

" अरे उदय ही कविता झाली. किती छान कविता केली. आता माझी ऐक " लगेच अभयने सुरुवात केली.

" झाड माझा सखा, झाड माझं जीवन
बागेत या सुंदर, रमलं माझं मन.... "

" अरे अभय तुझी कविता किती सुंदर आहे " उदयला अभयची कविता भारी आवडली.

" अभय मी ठरवलंय.... आपणही झाडं लावायची..! झाडांमुळे ताजी हवा मिळते. वातावरण थंड राहत. " उदयने मनातले सांगितले

" चल उदय? "

" कुठे रे? "उदयने विचारले.

" अरे चल... ती बघ, वाटिका आहे. तिथे इवली इवली रोपं मिळतात. ती घरी नेऊ आणि झाडं लावू. " अभयने वाटिका दाखविली.

" अरे जवळ आहे. चल. " अभय उदय वाटिकेकडे चालू लागले.

" गुलाब, मोगरा, अबोली, सदाफुली, शेवंती, तुळस ही झाडं मी आईसाठी घेणार आहे. मलाही फुलझाडं खूप आवडतात. "अभयने फुलझाडं घेतली.



" पेरु, सफरचंद, डाळींब, लिंबू, कढीलिंब, वांग, टमाटे, ही झाडं  मी लावणार आहे. मागे मोठं आंगण आहे. आंगण कसं हिरवंगार दिसेल. "उदयने फळझाडं घेतली.

दोघंही आनंदात चालू लागले.

झाड माझा सखा, झाड माझं जीवन... दोघही गुणगुणत होते. आनंदात गात होते. खुशीखुशीत घराकडे चालले होते.

## खरी पूजा

आजोबा - हे काय राजू ! मातीचा गणपती!! आश्चर्य आहे. कुठून आणलास? तुला मातीचा पार्थिव गणपती आवडत नाही. होय नं?

राजू - आजोबा ऽ.... आता आवडतो.

आजोबा -  तुला रंगित गणपती आवडायचा. आता हा  बदल कसा काय झाला? कुणी जादु केली आमच्या या लुच्च्यावर?

राजू - आजोबा पूर्वी मातीची मूर्ती मला आवडत नव्हती. रंगित मूर्ती आवडायची. पण मी माझ्या मित्रांबरोबर  मूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेत  गेलो होतो. तिथे आम्हाला छान माहिती दिली.

आजोबा - अरे कुठली माहिती दिली? आम्हालाही  सांग.

राजू - तिथे आम्हाला सांगितले की कृत्रिम रंग जलचर प्राण्यांना घातक असतात. म्हणून मूर्ती रंगवायची नाही. प्लास्टर ऑफ पॅरीसची मूर्ती पाण्यात विरघळत नाही, मातीची मूर्ती पाण्यात विरघळते. म्हणून मूर्ती मातीची करायची. आणि आजोबा आणखी एक गंमत आहे.

आजोबा - आता आणखी कुठली गंमत राजा?



राजू -  गंमत म्हणजे..... या मातीत आम्ही झाडांच्या बियां टाकल्या आहेत.

आजोबा - गणपतीच्या मूर्तीत बियां कशाला टाकायच्या?

राजू  - अहो आजोबा..... आता  घरीच बादलीत गणेश विसर्जन करायचं. ते पाणी आणि माती कुंडीत, किंवा अंगणात, मातीत टाकायचं. काही दिवसांनी तिथे झाडं येतीलं

आजोबा - अरे वा! शाब्बास!  आता या मूर्तीची पूजा करायची बरं.

राजू - हो! ... आजोबा निसर्गाचं रक्षण, वृक्ष संवर्धन हीच खरी पूजा आहे.

७

# रक्षाबंधन

कालपासून मनात एकच विचार सुरु होता. रुपाने सानिकाला बोलावले.

' राखीचा सण आपल्याकडे आपण साजरा करु. किती आनंद होईल मुलांना आणि मुलींना! पण परवानगी मिळेल कां? पैशाचाही प्रश्न आहेच. ' रुपाने तिच्या मनातलं सांगितलं

'अग राख्या आपणच तयार करु. तो प्रश्न नाही. पण परवानगी? 'सानिकाने शंका व्यक्त केली.

'आपण जयश्री ताईंना विचारू! '

'हो ग! त्यानांच विचारु या. '

जयश्री ताई आल्या. सानिकाने रुपाला खुणावले. रुपा म्हणाली थोडं थांबून जाऊ.

जयश्री ताई एकट्याच होत्या.

'ताई.... '

'बोला.. अग बोला. '



सानिका म्हणाली  ' ताई आपण आपल्याकडे रक्षाबंधन दिन साजरा करु या. इथल्या सगळ्या आमच्या भावांना राखी बांधू. आम्हाला खूप आनंद होईल. '

' इथल्या मुलांनाही खूप आनंद होईल. किती मजा येईल हो ताई. ' रूपा मनापासून म्हणाली.

जयश्री ताई त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद टिपत होत्या.

' ठिक आहे. आपल्या आश्रमात राखीचा सण आपण साजरा करु. '

जयश्री ताईनी रेशमी धागे, टिकल्या, खडे, स्टिकर फेवीस्टिक खूप सारं सामान दिलं. मुलींनी सुंदर सुंदर राख्या  तयार केल्या.

राखीच्या दिवशी आश्रमाच्या आवारात मुलं आणि मुली रांगेत बसली. समोर खुर्च्यांवर प्रमुख पाहुणे, मॅनेजर सर, जयश्री ताई आणि ताईंची मैत्रिण रेखा ताई बसल्या. स्वागत समारंभ झाल्यावर रेखा ताई बोलायला उभ्या राहिल्या,

" माझ्या मित्रांनो आणि मैत्रिणींनो.... तुम्ही किती भाग्यवान आहात! मुलांना एवढ्या साऱ्या  बहिणी मिळाल्यात. आणि मुलींना इतके सारे भाऊ मिळालेत. अग  मी  फार एकटी होते. आई बाबा नोकरी करायचे. मी घरी एकटी असायची. सणालाही एकटीच असायची. तुम्ही सगळे एकमेकांना आहात. खूप छान वाटतं.

मुलांनो, तुम्हाला विशेष सांगायचं म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांसारखं ' पर स्त्री माते समान ' हे तत्व जीवनात स्विकारा. कल्याणच्या सुभेदाराची सून शिवाजी महाराजांना

नजराण्यात दिली होती. त्यांनी तिला बहिण मानून तिची सुरक्षित सन्मानाने बोळवण केली. स्त्रीला मान द्या. सन्मानाने वागवा.

श्रीकृष्णाने द्रौपदीला आपला शेला पांघरुन भरसभेत रक्षण करून सन्मानाने तिला पाठविले. नरकासुराशी युद्ध करुन  त्याच्या कैदेतील सोळा हजार स्त्रीयांना सोडवून त्यांच्या पालन, पोषण, रक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांना प्रतिष्ठा दिली. जसा गणपती, राष्ट्रपती असतो तसा तो त्यांचा पती होता.

तुम्ही मुलांनी स्त्री संरक्षणाची सामाजिक जबाबदारी आहे ही मानसिकता बिंबवून वागावं असं मला मनापासून वाटतं.

असा हा भाऊ बहिणीच्या प्रेमाचा  राखीचा  सण आहे. बहिणींनी भावाच्या पाठीशी उभे रहावे आणि भावांनी भगिनी प्रेमाचे नाते निभवावे. भाऊ बहिणीचे नातं जपणारी ही राखी  रक्षाबंधन आहे.

धन्यवाद. '

रेखा ताईंचे भाषण खूप छान झाले. सगळ्यांना आवडले. टाळ्यांचा कडकडाट झाला.

आणखी कुणाला आपले विचार मांडायचे असल्यास कृपया व्यासपीठावर यावे.. सूचना झाली. आणि रुपा भाषण द्यायला उभी राहिली.

" वंदनीय माननीय  मोठ्या लोकांना माझा हृदयापासून नमस्कार. सगळ्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा!

रक्षण ही प्राथमिक गरज आहे. लहानांना आणि वृद्धांना शारिरीक मानसिक आर्थिक रक्षणाची विशेष गरज आहे. म्हणूनच आम्ही रक्षाबंधनाचा कार्यक्रमाकरिता वृद्धाश्रमात जाऊन राखी बांधून घेणार आहोत. आपल्याला वृक्ष रक्षणाची हाक ऐकू येतेय. वृक्षरक्षण



आणि वृक्षसंवर्धनाच्या जबाबदारीतून आम्ही वृक्षांना राखी बांधणार आहोत. आम्ही कराटेचे प्रशिक्षण घेत आहोत. आम्ही स्वरक्षणाची राखी स्वतःला बांधतो.

म्हातारपणात आई वडिलांच्या रक्षणाची जबाबदारी मुलामुलींनी घ्यावी असं मी मनापासून सांगते... रूपाचे डोळे  भरुन आले. मन भरून आलं.... क्षणभर थांबून ती म्हणाली आम्हाला आई वडिल नाहीत. पण इथल्या बाबांनी आणि ताईंनी आई वडिलांप्रमाणे आम्हाला वाढवलं. त्यांना आम्ही राखी बांधतो.

मला हेच सांगायचे की जसे सैनिक देशाच्या रक्षणाचे कर्तव्य जबाबदारीने पार पाडतात. तद्वत आपण राखीचे बंधन निभावून हे स्नेहबंधन असेच दृढ ठेऊ. नमस्कार. "

आनंदाने सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

" किती सुंदर मनोगत व्यक्त केलस. अभिनंदन रुपा " म्हणत सानिकाने कौतुक केले.

सगळ्या बहिणींनी भावांना राखी बांधली. आनंदाने सण साजरा केला. आज आश्रमात आनंदी आनंद होता!

८

## सोलर मून

अंधार पडायला सुरुवात झाली की राजूच्या मनात भितीच सावट दाटू लागायचं. सकाळी मोठमोठ्या गप्पा मारणारा राजू.... रात्रीच्या अंधारात भित्री भागुबाई बनायचा. अंधाराची त्याला खूप भिती वाटायची. अंधाराचा रागही यायचा. अंधार म्हणजे चोर, डाकू, खुनी, बदमाश, भूत, राक्षस यांचे राज्य असे त्याला वाटे. म्हणून त्याला अंधार आवडत नव्हता.

अंधार नको वाटायचा. आणि त्यातच अंधाऱ्या रात्री लाईट गेले की त्याची पाचावर धारण बसायची. घरातल्या घरात चार भिंतीतही त्याला भिती वाटायची. पण तेच.... पौर्णिमा. असली की तो खूष असायचा!!त्याची भिती पौर्णिमेच्या धवल प्रकाशात पळून जायची. चंद्राच्या मंदप्रकाशात तो निर्भय मनाने मनसोक्त हिंडायचा. त्याला पौर्णिमेची रात्र आवडायची. पौर्णिमा आवडायची. पौर्णिमेचा प्रकाश धैर्यदायी वाटायचा. त्याच्या मनात आले अशी नेहमीच पौर्णिमा असती तर! ...

कसं शक्य आहे. कारण पौर्णिमा ही पृथ्वी आणि चंद्राच्या भ्रमणामुळे येते. विचार करता करता क्षणभर त्याच्या मनात कल्पना आली.... असाच पृथ्वीवर प्रकाश देणारा दुसरा चंद्र असता तर! ... एकांतर चंद्र.! जो पृथ्वीवर नेहमी दररोज रात्री मंद प्रकाशित राहिल... चंद्रासारखा! ... दुसरा चंद्र! .. पौर्णिमेच्या चंद्रासारखामंद शीतल प्रकाश देणारा दुसरा चंद्र हवाच..!

दुसरा चंद्र..! त्याच्या डोक्यात दुसऱ्या चंद्राने ठाण मांडले. केंव्हाही त्याच्या डोक्यात तेच विचार यायचे.... दुसरा चंद्र निर्माण करायचा.

एक दिवस त्याने ही अफलातून कल्पना आपल्या मित्रांना ऐकवली. त्याच्या मित्रांनी त्याची पार टर उडवली. पण त्याचा खास मित्र केतन हुषार होता. तो म्हणाला " राजू कृत्रिम



चंद्र निर्माण न करायला काय झालं? आपण कृत्रिम चंद्र निर्माण करू शकू. जिथे कृत्रिम उपग्रह तयार होतात, तिथे कृत्रिम चंद्र म्हणजे पृथ्वीचा कृत्रिम दुसरा उपग्रह तयार करता यायलाच हवा. आपल्याला फक्त पृथ्वीवर प्रकाश पसरविणारा उपग्रह हवा? करू आपण तयार!

दोघांच्याही डोक्यात तेच विचार होते. कृत्रिम उपग्रह तयार करायचा! ... राजू आणि केतनने पक्क ठरविले आणि  दोघांनीही ठरल्याप्रमाणे कामाला सुरुवात केली.

एक मोठ्ठा उपग्रह तयार करायचा होता. प्रकाशणारा.. रात्री प्रकाशणारा.! प्रकाश देणारा कृत्रिम चंद्र, जो फक्तफक्त पृथ्वीभोवती फिरत राहिल, त्याचे प्रकाशाचे क्षेत्र, त्याचा आकार, त्याची त्रिज्या, त्याचे वजन, त्याची फिरण्याची कक्षा, त्याची गति, तो किती उंचीवरून फिरेल, तो पृथ्वीपासून किती  अंतरावर राहिल वगैरे वगैरे गणित तयार झाले. त्यांनी एक प्रतिकृती तयार करण्यास सुरुवात केली.

केतन म्हणाला, " चंद्र हा परप्रकाशित असतो. तो सूर्याच्या प्रकाश तेजातून प्रकाशतो. मग आपणही सोलर मून तयार केला तर?

जो सोलर मून सकाळी सूर्यापासून प्रकाश घेऊनरात्री प्रकाशेल. आपल्याला सोलर विद्युतचा उपयोग करावा लागेल. मग दोघांनी मिळून सोलर मून तयार केला.

राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात त्यांचे सोलर मूनचे कार्यरत प्रतिकृती बघून सगळ्यांना आश्चर्य वाटले. सोलर मून खूप आवडला. राजू केतनचे खूप कौतुक झाले. त्यांना राज्यस्तरीय  पारितोषिक मिळाले. प्रशस्तीप्रत्रक मिळाले. सगळ्या मित्रांनी राजू केतनची प्रशंसा केली.

आता पुढे आयुष्यात वैज्ञानिक होऊन असा प्रत्यक्ष सोलर मून तयार करायचा असं मनात पक्क ठरवून केतन राजू राज्य पारितोषिक घेऊन आले.

९

# इंन्स्टंट फुड

राजूला पाऊस खूप आवडायचा. पावसात मस्त भिजावे, खेळावे, थेंबासवे नाचावे, वाऱ्यासवे बागडावे.

पण यावेळचा पाऊस भयंकर होता. वारं, वादळ पावसाला उसंत नव्हती... दोन महिने धुव्वाधार पाऊस बरसत होता.

"नद्या भरभरुन वाहत होत्या. भयानक पूर होता! गावात पाणी, रस्त्यावर कंबरभर पाणी, घरासमोर पाणी, घरात पाणी, शेतात पाणी.... अती पाण्यामुळे धान्य भाजीपाला, पीक सारं सडून गेल होत. पीकाची नासाडी झाली होती! ... अतिवृष्टीमुळे जनजीवन अस्ताव्यस्त झालं होतं. देशात पुराने, पावसाने, पाण्याने हाहाःकार माजला होता! " हे सारं टी व्ही वर राजू आणि सोनू बघत होते. राजू उदास झाला होता. सोनूचे मन हळहळले.

"देशाच्या एका भागात जीवघेणी पूर परिस्थिती तर दुसऱ्या भागात भयानक दुष्काळ! पाण्या अभावी धान्य पीकत नाही! अति पाण्यामुळे पिक सडून जातं! केवढा निसर्गाचा कोप!! एकीकडे ओला दुष्काळ, दुसरीकडे कोरडा दुष्काळ! असा नेहमीच दुष्काळ पडला तर? ...

पुढे धान्य पिकलं नाही तर? .... लोकांना अन्न मिळणार नाही! पोट कसं भरावं? शेतात धान्य पिकलं नाही तर लोकांना उपाशी मरायची पाळी येईल रे सोनू " राजूचे डोळे भरुन आले.

असाच नेहमी दुष्काळ पडला तर? ... पुढे धान्यच नाही पिकलं तर? ... कसं होईल पुढे राजू? लोक अन्न धान्यावाचून उपाशी मरतील. " सोनूचा गळा दाटून आला...

सोनू त्याच्या घरी गेला



राजू विचार करत होता....

"आज विज्ञान एवढे पुढे गेले आहे. माणूस टेस्टट्युब बेबी निर्माण करू शकतो, रोबोट तयार करतो, फास्ट फुड, बेबी फुड तयार करतो.

पण अन्न  धान्य तयार करू शकत नाही! विज्ञानाच्या प्रगतीत धान्य तयार करायचे कारखाने काही निघाले नाहीत. ".., विचार करता करता नेहमी प्रमाणे राजूला एक अफलातून कल्पना सुचली.

मानवाची  अन्न  ही प्राथमिक  प्रमुख गरज आहे. अन्न म्हणजे गहू, तांदूळ, ज्वारी, डाळी, भाज्या, फळे वगैरे सर्व आवश्यक आहे. यामध्ये सामान्य अन्न घटक कार्बोहायड्रेटस्, प्रोटीन्स आणि फॅटस् हे आहेत. याशिवाय व्हिटॅमिन्स आवश्यक आहेत. अन्नाच्या मुख्य घटकांचे पचनानंतर रुपांतर शेवटी ग्लुकोज, अमिनो आम्ल आणि फॅटी ॲसिड मध्ये होते. म्हणजेच शरीराला शेवटी ग्लुकोज, अमिनो आम्ल आणि फॅटी ॲसिडची आवश्यकता आहे. हे सरळ रक्तात मिसळतात. आणि पेशी श्वसन होऊन मानवाला दिवसभराकरिता कार्य उर्जा मिळते. पेशींची वृद्धि होऊन शरीराची वाढ होते.

शरीराची झीज भरुन निघण्याकरिता, कार्य उर्जेकरिता, शरीराच्या मागणीकरिता माणूस अन्न सेवन करतो.

मग ग्लुकोज, अमिनो आम्ल, आणि फॅटी ॲसिड सरळच तयार केलेत तर? जसे लहान मुलांचे डब्याचे दुध  तयार करतात.. डब्यात ज्या प्रमाणे कृत्रिमरित्या दुध तयार करतात अगदी तसेच  हे तयार करता येईल. ग्लुकोज, अमिनो आम्ल, फॅटी ॲसिड, व्हिटॅमिन यांच्या पाचक आहाराच्या गोळ्या तयार करायच्या किंवा द्रव पदार्थ तयार करायचे.

किती प्रमाणात कोणता घटक पदार्थ शरीराला लागतो, एका व्यक्तीला किती ग्रॅम अन्न घटकांची आवश्यकता असते, त्या प्रमाणे या गोळ्या तयार करायच्या. लहान मुलांना, वाढत्या

मुलांना, प्रौढ व्यक्तीला, वृद्धांना, महिलांना, त्यांच्या वयाप्रमाणे, कामाप्रमाणे गोळ्या घ्याव्या लागतील. घरात गोळ्या डब्ब्यांमध्ये भरुन राहतील. आवश्यकतेनुसार सरळ या फुड टॅब्लेटस् खायच्या आणि दिवसभराची कार्य उर्जा प्राप्त करायची

शेती पिकवण नको. स्वयंपाक नको, दीर्घ पचन क्रिया नको. कुठलीच झंझट नको. इंस्टंट फुडमध्ये ए, बी, सी, डी, ई हे सर्व व्हिटॅमिन असून कॅल्शियम फास्फोरस सोडियम हे सर्व प्रमाणात राहतील.

इंस्टंट फुड खा. स्वस्थ आणि मस्त रहा.



# सहल

शाळेतले सगळे विद्यार्थी खूष होते. सहल जाणार होती! पण कुठे काय नक्की माहित झालं नव्हत. कुणी म्हणे ताडोबाला, तर कुणी म्हणालं हैद्राबादला!

तेवढ्यात राजू, पार्थ, समिर, मिकी जमले.

"राजू खरंच आपली पिकनिक कुठे जाणार आहे? "

" वृद्धाश्रमात! .. "

काय? वृद्धाश्रमात? तिथे काय पाहणार? तिथे आपण काय करणार? "

" पण सगळ्यांना सहलीची सक्ती आहे. सहल अभ्यासाचाच भाग आहे, असे सर म्हणालेत. "

"बापरे! म्हणजे वृद्धाश्रमात जाणं भागच आहे. "

"अर्थात! बच्चम जी आता कुठे भागता येत नाही! "

" चला रे चला "

नववीच्या वर्गातली मुलं सकाळी नऊ वाजता जाऊन बसमध्ये बसली. गावापासून आश्रम थोडा दूर होता. बसमध्ये नाच, गाणे, जोक्स सुरु होते. मुलं मोकळ्या वातावरणात मस्त मुडमध्ये मजेत होते.

वृद्धाश्रमात मुलं दाखल झालीत. त्यांच्या व्यस्थापकांनी खूप छान स्वागत केले. विद्यार्थी येणार म्हणून वृद्धाश्रमाचे  फाऊंडर मेंबरही आज खास आले होते.

आश्रमाच्या हॉलमध्ये 30-35 ज्येष्ठ नागरिक खुर्च्यांवर बसले होते. एक आजी व्हीलचेअरवर बसल्या होत्या. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला होता.

आम्ही छान छान गाणी म्हटली. किती आनंद दिसत होता त्यांच्या चेहऱ्यावर! नंतर त्यांनी पण भक्तीगीत भावगीत म्हटली. एका आजींनी खूप छान खड्या आवाजात भजन म्हटल. त्यांच वय एकशे चार वर्ष होत. आणि त्यांना भजन पाठ होत. त्यांची स्मरण शक्ती त्यांचा आवाज..

किती कौतुक करावे. दोन आजोबा तर मस्त नाचले.

सगळ्यांनी कौतुकाने टाळ्या वाजवल्या. मजा आली.

एका आजोबांनी कविता म्हटली.

आमचं काय चुकलं?

बालपणात तुमचे लडिवाळ
हट्ट आम्ही सारे  पुरविले
हौस मौज लाड कौतुक
प्राणापलिकडे प्रेम केले
आमचे काय चुकले? ....

आईने कदाचित खाल्ले नसेल
तुम्हाला सारे खाऊ घातले



बापाने  कपडे शिवले नाही
तुम्हाला राजकुमारा सारखे ठेवले
आमचे काय चुकले? ....

आजारी पडलेत तेंव्हा
जागून रात्रभर देवाला आळविले.
काळजातून काळजी घेऊन
तुम्ही मोठे व्हावे मनी चिंतिले
आमचे काय चुकले? ....

फी, पुस्तक, शिकवण्या क्लासेस
तुमच्या मनाप्रमाणे शिकविले
आई बापाने किती कष्ट करुन
सारं काही आनंदाने झेलले
आमचे काय चुकले? ....

निराश कधी होऊ दिलं नाही
पंखाना तुमच्या बळ दिले
घरात तुमच्या जागा नाही
आम्हाला एकटे टाकून दिले.
आमचे काय चुकले? ....

म्हातारपणची काठी पुत्रांचा आधार
माता पित्याच्या नात्याला तडे गेले
स्वप्नातही बघितला नव्हता आश्रम

पुत्रांचे प्रेम क्षणात कसे आटले.
आमचे काय चुकले?

सगळे सुन्न झाले होते. त्यानंतर एक आजी आल्यात. त्यांनी त्यांची स्वरचित कविता म्हटली.

घर शेवटी घर असते....

घरात आपण स्वतंत्र असतो
आपल्या मर्जीने राहत असतो
आपल्या आवडीचे खात असतो.
घर आपल्याशी बोलत असते
घर शेवटी घर असते....

प्रत्येक वस्तू आपण जपतो
कष्ट मेहतीने आपण मिळवतो
आपण घरावर प्रेम करतो
घराची काळजी असते
घर शेवटी घर असते....

आपण स्वतंत्र निर्णय घेतो
आपण एकमेकांवर प्रेम करतो
रेशिमधाग्यांनी बांधलेलो असतो.
नातेवाईकांचे येणे जाणे असते.
घर शेवटी घर असते....



येणाऱ्याची वाट बघतो.
जाणाऱ्याला जप म्हणून सांगतो
काळजातून काळजी करतो.
घरात आपलेपण असते
घर शेवटी घर असते....

थोड दुखलं तर काळजी घेतो.
प्राणापलिकडे प्रेम करतो.
देवाजवळ प्रार्थना करतो.
मन एकमेकांचे हित चिंतीते
घर शेवटी घर असते....

घरात आपली मुलं असतात.
आई बाबांचे आशिर्वाद असतात.
सुख दुःखात एक असतात.
आनंद समाधान नांदत असते.
घर शेवटी घर असते....

सगळ्यांच्या डोळ्यातून अश्रु पाझरू लागले.

त्यांची व्यथा कवितेत उतरली होती. अंतरातून उमटली होती. हृदय हेलावले. सर्व मूक झालेत. अंतर्मुख झालेत.

आम्ही सगळे विद्यार्थी उभे राहिलो आणि शपथ घेतली... " आम्ही आमच्या आई वडिलांना शेवटपर्यंत सांभाळू. त्यांना कधी अंतर देणार नाही. आम्ही त्यांना वृद्धाश्रमात कधीच पाठवणार नाही. आई वडिलांचे ऋण आजन्म विसरणार नाही.

सगळ्या ज्येष्ठांना  शाळेतर्फे प्रत्येकी एक वुलनची गरम शाल दिली. सगळ्या मुलांनी त्यांच्याकरिता खाऊ आणला होता. आज हे सगळे आजी आजोबा खूप आनंदात होते. जसे त्यांचे प्रत्येकाचे नातू त्यांना भेटायला आले होते.

व्यवस्थापक म्हणाले त्यांना ए सी रुम आहेत. गिझर आहे. इथे इन्व्हरटर आहे. इंटरकॉम आहे. प्रत्येकाच्या तब्बेतीची पुरेपूर काळजी घेतो. समाधानाची गोष्ट म्हणजे प्रत्येकाला सरकारकडून  हजार रुपये पेन्शन आहे. सगळे छान खेळीमेळीने राहतात. आम्ही त्यांना आई वडिल समजतो. आज तुम्ही आलात.  नातवंडं भेटल्यागत त्यांना वाटले. त्यांना खूप आनंद झाला.

नंतर आम्ही सगळे त्यांच्या डायनिंग हॉलमध्ये गेलो . त्यांच्या प्रत्येकाच्या ताट वाटी पेले होते.
पुलाव, पनीर, पुरण पोळी, फुलके, श्रीखंड कोशिंबीर, भजे पापड  असे शाळेकडून त्यांना मस्त जेवण दिलं. त्यांच्या सोबत आम्ही मस्त जेवलो.

सगळ्यांशी व्यक्तीगत भेटून गळाभेट घेतली. त्यांनी नमस्कार केला. त्यांनी डोक्यावर हात ठेवून तोंडभरुन आशिर्वाद दिला.

" आपण पुन्हा भेटू "असे म्हणून त्यांचा निरोप घेतला.



अखिल भारतीय बालसाहित्य पुरस्कार स्विकारताना मीना खोंड



परिचय..

मीना खोंड

आंतरराष्ट्रीय कवयित्री, लेखिका

मूळतः वरोरा महाराष्ट्राची  असून विवाहोपरांत  आंध्र प्रदेशात  वास्तव्य.

उच्च माध्यमिक शाळेत प्रिंन्सिपल (निवृत्त )

सध्या हैद्राबाद येथे वास्तव्य

भाषा.. मराठी, हिंदी, इंग्लिश, तेलगू लेखन.. अनुभव 40 वर्षे

शिक्षण.... B. Sc, B. Ed

मॅट्रीकला ओपन मेरिट, बी. एड ला सेंन्टरला प्रथम

विज्ञान स्नातक आणि शिक्षा स्नातक

नोकरी.... सरकारी उच्च विद्यालयात प्राचार्य पदावर.... ( निवृत्त. )

*लेखन....

---

कथा, कविता, ललित लेख, पद्य पथ नाटिका,

कादंबरी... बालकथा, बालकविता

मराठी, हिंदी भाषांमधे लिखाण आहे.

मराठी, हिंदी, तेलगू इंग्लिश या चार भाषात पुस्तके प्रकाशित आहेत.



*लेखन अनुभव.... 40वर्ष

प्रकाशितसाहित्य...

*मराठी

1अक्षर - (बालकथा संग्रह) दिलीपराज प्रकाशन पुणे

2क्षणैक- ( कथासंग्रह )अक्षता प्रकाशन  पुणे.

3ओंजळ - (कविता संग्रह) कल्पना प्रकाशन.

4 हॅपी बर्थ डे -(बाल कविता) साकेत प्रकाशनऔरंगाबाद

5 सुपरमॅन -कौस्तुभ प्रकाशन नागपूर.

6 चला चला सुंदर देशात -कौस्तुभ प्रकाशन.

7 मानससरंग -चारोळ्या

8 गीत गजानन -वेद प्रकाशन नाशिक.

9 गजानन चालीसा -वेद प्रकाशन

10 सीता शक्ती... कादंबरी

*हिंदी

11 एहसास -हिंदी कविता संग्रह

12बेटी घर की शान - पद्द पथ नाटिका.

13 माय फ्रेंड -बालकथा संग्रह विश्वज्ञान प्रकाशन दिल्ली.

14 स्वयं.... ललित लेख

*तेलगू भाषेत अनुवाद

15पिलक ब्राह्मणडू -शेंडीधारी

16तेल्ला पालरमू -पांढरे कबूतर

*इंग्लीश मधे अनुवाद

17MyBeauyltiful country- गीता प्रकाशन

संपादित..

18 कथावली 3.. संपादन, मेनका प्रकाशन

19प्रिय हा भारत देश... संपादन, विजया वाड

20 हिलेस का काव्य जगत.. हिंदी लेखक संघ

*आंतरराष्ट्रीय....

भारतीय उच्चायोग लंडन येथे बहुभाषी कविसंमेलनात मी कविता सादर केली.

डिस्कव्हरी चॅनेलसाठी असलेल्या Body bezarre London च्या स्टुडिओत एका स्टोरीचा मराठी वऱ्हाडीचे इंग्लिशमधे अनुवाद संपादन केले.

लंडन मराठी रेडिओवर मुलाखत आणि कविता वाचन

जर्नालिझम युनि ऑफ लंडनच्या स्टुडंटने माझी मुलाखत घेतली होती.

टी व्ही वर... लंडनमध्ये घरगुती गणेशोत्सव आणि संस्कार संस्कृती संदर्भात बातमी प्रसारीत.

*अनुवाद श्री क्षेत्र भद्राचलम् महात्म्य

*आकाशवाणी...



लंडन मराठी रेडिओवर  Live मुलाखत कविता, वाचन

ई प्रसारण रेडिओ... कविता, कथा, लेख असे एक तासाचे सादरीकरण

आकाशवाणी नागपूर कविता, ललित लेख वाचन

आकाशवाणी हैद्राबाद येथे कविता वाचन

संपादित मराठी हिंदी पुस्तकातून कथा कविता प्रकाशित

*पुरस्कार

1अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलन पुरस्कार, नागपूर

2 महाराष्ट्र मंडळ तेलंगणा सन्मान, हैद्राबाद

3आनंद गौरव पुरस्कार, पुणे

4जगदीश खेबुडकर काव्य पुरस्कार, पुणे

5कवयित्री इंदूमती लांडगे सन्मान, पुणे

6गीत चांदनी पुरस्कार, हैद्राबाद

7महारानी झांसी पुरस्कार, हैद्राबाद

8 संस्कार भारती, भैंसा

9ब्राम्हण समाज सन्मान भैंसा

10 म. सा. प. हैद्राबाद

11आंतरराष्ट्रीय महिला दिन पुरस्कार, हैद्राबाद

12कादंबिनी क्लब हैद्राबाद, सम्मान

13भारतीय उच्चायोग लंडन, सन्मान

14 ऑथर गिल्डस् ऑफ इंडिया, सन्मान

15मॅट्रीकला ओपन मेरीट आल्याबद्दल सत्कार

*कवी संमेलन

---

भारतीय उच्चायोग लंडन येथे बहुभाषा कविसंमेलनात कविता सादर केली.

९०वे अ. भा. म. सा. सं डोंबिवली येथे निमंत्रित कवयित्री होते.

तेलंगणा वर्धापन समारोहातील बहुभाषी कविसंमेलनात आमंत्रित कवी होते

लंडन, हैद्राबाद, नागपूर, वरोरा, निजामाबाद, भैंसा इ. ठिकाणी हिंदी मराठी कविसंमेलनात सहभाग.

*लेखन विषयक

---

मराठी लेखन

महाराष्ट्र मंडळ दिवाळी अंक लंडन, महाराष्ट्र टाईम्स, तरुणभारत, लोकसत्ता, लोकमत,

लोकपत्र, सकाळ, देशोन्नती, सामना वर्तमान

पत्रात आणि

पंचधारा, श्रीसर्वोत्तम, माझीसहेली, स्त्री, म- मराठीचा पद्यगंधा, गृहशोभिका वसुधा,

अन्नपूर्णा, चक्रपाणी, साहित्य लेणी, सुगंध, मैत्रिण, अप्सरा,

श्रमिक एकजूट, सज्जनगड, लोकप्रभा,



दै. स्वाभिमानी

छावा, जन आधार, शब्द शिवार, बृहन् मायमराठी

इ. मासिकात, दिवाळी अंकात कथा, कविता,

ललित लेख सातत्याने प्रकाशित झाले आहेत.

किशोर, आनंद, कुमार, मुलांचे मासिक, चंपक, चिव चिव चिमणी,

बालवाडी, छोट्यांसाठी गंमत, गंमत जंमत,

देवपुत्र इ. दिवाळी अंकात, मासिकात बाल साहित्य प्रकाशित झाले आहे.

*हिंदी लेखन

हिंदी मिलाप, वार्ता, सरिता, सरस सलिल, गृहशोभा, अहल्या, गोलकोंडा ददर्पण, साहित्य सेतू, स्त्रीकाल, कालजयी, पब्लीक लाईफ समाचार, राष्ट्रनायक, दक्षिण समाचार, प्रसंगम, सृजन पंखुडी, अरुण, देवपुत्र, बालहंस, चंपक, इ. हिंदी वर्तमान पत्रात, मासिकांमधे कथा, कविता साहित्य  प्रकाशित झाले आहे.

* अनुवाद श्री क्षेत्र भद्राचलम् महात्म्य


*महिला समाजाचे कार्य, दासबोध, स्वाध्याय


बालसंस्कार केंद्र, भाषणं देणं


*पर्यटन.... लंडन, पॅरीस, स्वित्झरलॅंड, बेल्जियम, जर्मनी, रोम, व्हेनीस, स्कॉटलॅंड, युके.


# ई साहित्य प्रतिष्ठानच्या बालविभागातील खुप खुप छान छान पुस्तके


www.esahity.com आणि www.esahity.in

















http://www.esahity.com/2348236623542360236623612367234023812351.html

या लिंकवर विनामूल्य उपलब्ध आहेत

